# पुणे भारत स्काऊटस् आणि गाईडस् जिल्हा संस्था, पुणे

१७७३,सदाशिव पेठ, भिकारदास मारुती जवळ पुणे-४११०३०

ईमेल-punebsg२४४४@gmail.com फोन नं० २०-२४४७३२१०


जा क्र ४४४/१८-१९ दि. १६/०१/२०१९

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालय व अध्यापक विद्यालय,
जि.पुणे

**विषय: सन २०१८-१९ या सत्रात रोव्हर/रेंजर युनिट नोंदणी करण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात रोव्हर/रेंजर युनिट सुरु करावे. भावी जीवनामध्ये चांगली मुल्यो रुजविण्याच्या दृष्टीने मुलांकरिता रोव्हर व मुलींकरिता रेंजरचा अभ्यासक्रम उपयुक्त आहे. रोव्हर करिता १ प्राध्यापक व रेंजर करिता १ प्राध्यापीका यांची युनीट लीडर म्हणून निवड करावी. वय वर्षे १५ पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची रोव्हर/रेंजर म्हणून नोंदणी करावी. त्यासाठी नोंदणी अर्ज सोबत पाठवित आहे. नोंदणी अर्ज पूर्ण भरुन खालीलप्रमाणे नोंदणी शुल्कासह **दि.०५फेब्रुवारी २०१९** पर्यंत **पुणे भारत स्काऊटस् आणि गाईडस् जिल्हा संस्था, १७७३ सदाशिव पेठ पुणे-३०** येथे पाठविणे आवश्यक आहे.

**अधिक माहितीसाठी फोन नंबर: ०२०-२४४७३२१०** ईमेल: punebsg2444@gmail.com

या क्षेत्रातील विविध उपक्रम आपल्या विद्यालय/कनिष्ठ महाविद्यालयात राबवावेत. यासाठी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील युनीट लीडरना मार्गदर्शनपर माहिती खालीलप्रमाणे आहे.

१)नोंदणी व पुर्ननोंदणी:

- आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात सुरु असणा-या पथकाची पुर्ननोंदणी व नवीन पथकाची नोंदणी करावयाची आहे. मागील वर्षी आपल्या विद्यालयात सुरु असणा-या युनिटची पुर्ननोंदणी तसेच नवीन युनिटची नोंदणी भारत स्काऊटस् आणि गाईडस् जिल्हा कार्यालय, पुणे येथे **दि.०५फेब्रुवारी २०१९** पूर्वी करावी.
- तीन प्रतीतील नोंदणी अर्ज सुवाच्च अक्षरामध्ये भरावा. रोव्हर/रेंजर युनिटकरिता स्वतंत्र अर्ज भरावा.१ नोंदणी अर्जातील नावांची (आधार क्रमांकासह) यादी कम्प्युटरवर (MD Word Format) इंग्रजीत तयार करुन त्याची सॉफ्ट कॉपी नोंदणी अर्जासोबत या कार्यालयास सादर करावी.
- युनीट लीडर म्हणजेच रोव्हर लीडर, रेंजर लीडर यांच्या रोव्हर/रेंजरमधील प्रशिक्षणाची माहिती अर्जामध्ये भरावी. अप्रशिक्षित असल्यास तसे लिहावे.
- नोंदणी शुल्काचा भरण खाली नमूद केल्यानुसार रोख/धनादेश(चेक)/धनाकर्ष(डी.डी.) व्दारा अर्जासोबत करावा.

सन २०१८-१९ या सत्रातील युनिट नोंदणी शुल्क खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | विभाग | शुल्क रक्कम |
|---|---|---|
| १ | रोव्हर-रेंजर विद्यार्थी नोंदणी शुल्क प्रत्येकी | १५/- |
| २ | रोव्हर लीडर/रेंजर लीडर प्राध्यापक/ प्राध्यापिकाकरिता प्रत्येकी | ५०/- |
| ३ | विद्यालय/कनिष्ठ महाविद्यालय सभासद नोंदणी शुल्क | १००/- |
| ४ | महाराष्ट्र स्काऊट-गाईड नियतकालिक | १००/- |

**२) वचनविधी कार्यक्रम:** प्रवेश अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर रोव्हर/रेंजर यांचा वचनविधी कार्यक्रम घेण्यात यावा.

**३) राज्य पुरस्कार:** निपुण अभ्यासक्रम पूर्ण होऊन ९महिने कालावधी पूर्ण झालेल्या व वय वर्षे २४च्या आतील रोव्हर आणि रेंजर राज्य पुरस्कार परीक्षेकरिता अर्ज करु शकतात. परंतु त्यांच्या युनिट लीडरने किमान प्राथमिक प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातून सदर पात्रता धारण करणाऱ्या रोव्हर आणि रेंजर यांना राज्य पुरस्कार परीक्षेस बसण्याकरिता प्रवृत्त करावे.

**४)राष्ट्रपती पुरस्कार:** राष्ट्रपती पुरस्कार हा रोव्हर आणि रेंजर अभ्यासक्रमातील सर्वोच्च पुरस्कार असून वय वर्षे २५च्या आतील राज्य पुरस्कार प्राप्त रोव्हर आणि रेंजर हे राष्ट्रपती पुरस्कार परीक्षेसाठी अर्ज करु शकतात. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातून पात्र रोव्हर आणि रेंजर यांना राष्ट्रपती पुरस्कार परीक्षेस बसण्याकरिता प्रवृत्त करावे.

५)**स्वच्छ भारत अभियान:** कनिष्ठ महाविद्यालय तिथे स्वच्छता अभियान राबविण्यात यावे. स्वच्छता अभियानांतर्गत शैक्षणिक वर्षात संपूर्ण वर्षभर विविध ठिकाणी स्वच्छता कार्यक्रमांचे आयोजन करावे.

६)**ध्वजदिन::** ७ नोव्हेंबर या दिनी स्काऊट गाईड स्थापना दिवस ध्वजदिन म्हणून साजरा करावा.

७)**दिन विशेष साजरे करणे:** कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन विशेष दिन साजरे करण्यात यावे व त्याचा अहवाल फोटोसह दर महिन्याच्या २० तारखेपर्यंत पुणे भारत स्काऊटस् आणि गाईडस् जिल्हा कार्यालयास सादर करावा.

८)**राज्यस्तरीय आदर्श स्काऊटर गाईडर पुरस्कार:** जिल्ह्यामध्ये विशेष कार्य करणाऱ्या, किमान हिमालय वुड बॅज प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या युनिट लीडर (रोव्हर लीडर/रेंजर लीडर) यांना महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस्, राज्य कार्यालयातर्फे दरवर्षी राज्यस्तरीय आदर्श स्काऊटर/गाईडर पुरस्कार देऊन सन्मानित केल्या जाते.

९) **समुदाय विकास कार्यक्रम:** शैक्षणिक वर्षात विद्यालय व युनिट स्तरावर खालील समुदाय विकास कार्यक्रम तसेच इतर विविध कार्यक्रम व प्रकल्प राबवावे.

१)वैज्ञानिक दृष्टिकोन
२)पर्यावरण संवर्धन व जनजागृती
३)जलसंवर्धन व जनजागृती
४) टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ वस्तू बनविणे
५)सुरक्षित रस्ता वाहतूक
६)कन्या वाचवा अभियान
७)नेत्रदान जागृती
८)पाणी अडवा, पाणी जिरवा जनजागृती
९)आपत्ती व्यवस्थापन
१०)व्यसनमुक्त जीवन:तंबाखू व मद्यार्कजन्य पदार्थ सेवनाविरुध्द जनजागृती
११)माता बालक आरोग्य कार्यक्रम: संतुलित आहाराची जाणीव
१२)पॉलिथीन बॅग, थर्माकोल, प्लास्टिक वस्तुचा कमीत कमी वापर
१३)ओल्या कचऱ्याचे खत व कोरड्या कचऱ्याचा पुन्हा उत्पादक वस्तुंसाठी वापर
१४)इंद्रधनुष्य उपक्रमांतर्गत क्षयरोग, कावीळ, गोवर, धर्नुवात, डांग्या खोकला, घटसर्प, पल्स पोलिओ लसीकरणाबाबत जनजागृती करणे.
१५) शेतकऱ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी युनिट मार्फत प्रयत्न करणे व त्यांच्या अडीअडचणी समजून घेणे.

१०)**<u>सेवा प्रकल्प:</u>** सेवा प्रकल्पांतर्गत यात्रेच्या वेळी भाविकांना रांगेत लावणे, भोजनकार्यात भोजन वाटप करण्यास सहकार्य करणे, पाणपोई प्रकल्पांचे आयोजन करणे, यात्रा महोत्सव, सामाजिक कार्यात स्वयंसेवक म्हणून युनिट मार्फत कार्य करावे.

आपल्या विद्यालयामध्ये उपरोक्त समुदाय विकास प्रकल्प, सेवा प्रकल्पांचे तथा विविध कार्यक्रम तथा प्रकल्पांचे आयोजन करुन त्याची माहिती व फोटो भारत स्काऊटस् आणि गाईडस् जिल्हा कार्यालयास पाठवावे. त्याचबरोबर अधिक माहितीसाठी www.msbsg.org या संकेतस्थळाला भेट द्यावी.

MRaut
शिक्षण उपसंचालक (नेशा)
**जिल्हा मुख्यालय आयुक्त(गा.)**
**पुणे भारत स्काऊट आणि गाईड**
**जिल्हा संस्था**

प्रत:
शिक्षणाधिकारी(माध्यमिक/प्राथमिक),
शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद, पुणे यांना माहितीस्तव.

# महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस्

७९, एफ रोड, मरीन ड्राईव्ह, मुंबई– ४०० ०२०.

| जिल्हा– |
|---|
| तालुका– |

## युनिट नोंदणी अर्ज

सन २०    –२०

(प्रत्येक युनिटसाठी स्वतंत्र नोंदणी अर्ज तीन प्रतीत भरावा)

---

१. युनिटचा प्रकार :– बनी/कब/स्काऊट/रोव्हर/बुलबुल/गाईड/रेंजर/हवाई/सागरी/विशेष

२. युनिटचे नांव :– ------------------------------------------ युनिट चार्टर नंबर ---------

३. शाळेचे नांव :– ------------------------------------------------------------

४. पत्रव्यवहाराचा पत्ता :– ------------------------------------------ पिन कोड ---------

५. शाळेचा ई– मेल आयडी-------------------------- शाळेचा दूरध्वनी क्र. कोड सह---------------

६. शाळा यु. आय.डी. क्र. ------------------------------ मुख्याध्यापक मोबा. क्र.--------------

७. युनिट लिडर बाबत माहिती.

| अ.क्र | संपूर्ण नांव | प्रशिक्षणाचे नांव | प्रमाणपत्र क्र. दिनांक | अधिकारपत्र क्रमांक व दिनांक | आधार कार्ड क्र. | ई– मेल व मोबाईल क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

८. सदस्यांची यादी :– (बनी/कब/स्काऊट/रोव्हर/बुलबुल/गाईड/रेंजर/हवाई/सागरी या पैकी)

| अ.क्र. | संपूर्ण नांव | इयत्ता | जन्मतारीख | आधार कार्ड क्र. | ई– मेल व मोबाईल क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३. | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |
| ७ | | | | | |
| ८ | | | | | |
| ९ | | | | | |
| १० | | | | | |
| ११ | | | | | |
| १२ | | | | | |
| १३ | | | | | |
| १४ | | | | | |
| १५ | | | | | |
| १६ | | | | | |
| १७ | | | | | |
| १८ | | | | | |
| १९ | | | | | |
| २० | | | | | |
| २१ | | | | | |
| २२ | | | | | |
| २३ | | | | | |
| २४ | | | | | |
| २५ | | | | | |

(टीप :– अर्ज ३ प्रतिमध्ये भरावा १ सत्य प्रत व २ झेरॉक्स प्रत मध्ये दयावी . १ राज्यकार्यालय २. जिल्हा कार्यालय ३. शाळा प्रत)नोंदणी अर्ज संगणकावर टाईप करुन आणावा किवा आपल्या हस्ताक्षरात भरावा.

| अ.क्र. | संपूर्ण नांव | इयत्ता | जन्मतारीख | आधार कार्ड क्र. | ई– मेल व मोबाईल क्र. |
|---|---|---|---|---|---|
| २६ | | | | | |
| २७ | | | | | |
| २८ | | | | | |
| २९ | | | | | |
| ३० | | | | | |
| ३१ | | | | | |
| ३२ | | | | | |
| ३३ | | | | | |
| ३४ | | | | | |
| ३५ | | | | | |
| ३६ | | | | | |
| ३७ | | | | | |
| ३८ | | | | | |
| ३९ | | | | | |
| ४० | | | | | |
| ४१ | | | | | |
| ४२ | | | | | |
| ४३ | | | | | |
| ४४ | | | | | |
| ४५ | | | | | |
| ४६ | | | | | |
| ४७ | | | | | |
| ४८ | | | | | |
| ४९ | | | | | |
| ५० | | | | | |

भारत स्काऊटस आणि गाईडस्‌ची ध्येये, नियम व कार्यपध्दती आम्हाला मान्य आहे. युनिटचे नोंदणी शुल्क– स्थानिक/ जिल्हा नोंदणी शुल्क रु–––––––/ या अर्जासोबत दिनांक. / /२० ने पाठविले आहे. युनिट नोंदणी करावी ही विनंती.

युनिट लिडर स्वाक्षरी दिनांक / / मुख्याध्यापक स्वाक्षरी दिनांक / /

राज्य संस्थेस नोंदणी अर्ज रक्कम रु. ––––––––––––– शुल्कासळ पाठविण्यात येत आहे.
नोंदणी शुल्क रु. ––––––––––––– पावती क्र. –––––––––––– दिनांक / /
एकूण नोंदणी शुल्क रु –––––––––––––––––––– प्राप्त झाले. सदर युनिट नोंदविले आहे.

जिल्हा संघटक / जिल्हा चिटणीस
शिक्का व स्वाक्षरी

अर्ज भरण्याची सुचना:–

१. अर्ज ३ प्रतीमध्ये भरुन नोंदणी शुल्कासह आपल्या जिल्हा कार्यालयाकडे पाठवाव्यात.
२. जिल्हा संस्था युनिट नोंदणी करुन १ प्रत शाळेकडे परत पाठविल. १ प्रत आपल्या कार्यालयामध्ये ठेवून १ प्रत राज्य कार्यालयाकडे पाठवतील.
३. युनिट नोंदणी दरवर्षी जिल्हा कार्यालयाकडे करणे आवश्यक आहे.
४. जिल्हा कार्यालयाने प्रत्येक महिन्याला १० तारखेपूर्वी राज्य कार्यालयाकडे नोंदणी अर्जाची प्रत व त्याची होणारी शुल्क पाठविणे आवश्यक राहील.
५. नोंदणी शाळा प्रत शाळेनी आपल्या दप्तरी अद्यावत ठेवावी.